
# ओब्दिहा,
# तुमचा मित्र





# ओब्दिहा, तुमचा मित्र

मराठी : अश्विनी बर्वे





ओब्दिहा जिथं कुठं जाई तिथं एक सिगलपक्षी त्याच्या मागे-मागे जाई. जेव्हा तो मेणबत्तीच्या दुकानात गेला तेव्हा सिगल त्याच्या मागे रस्ताभर होता. जेव्हा तो दुकानाच्या बाहेर आला तेव्हा सिगल त्याची वाट पहात होता.

जेव्हा तो ताजे मासे घेण्यासाठी बाजारात गेला तेव्हा सिंगल उद्या मारत त्याच्या मागे आला.



आणि रात्री जेव्हा तो झोपण्यासाठी अंथरुणावर पडे तेव्हा सिगल खिडकीमध्ये दिसे. हवेसाठी जी चिमणी केलेली होती त्यावर बसलेला असे. नॅनटक्ट बेटावर जेवढे सिगल होते त्यांच्यातला हा एक ओब्दिहा जिथे जाई तिथं का जात होता?



पहिल्यांदा जेव्हा तो ओब्दिहाच्या मागे गेला तेव्हा उबदार कपडे घालून सगळेजण नटूनथटून मिटिंगसाठी जात होते. स्टारबक कुटुंब मिरवणुकीसारखे एका ओळीत जात होते. सगळ्यात पुढे आई आण वडील होते. त्यानंतर मोसेस आणि एजा, रेबेका आणि ओब्दिहा आणि रेचेल चालत होते. त्यांच्या सगळ्यांच्या मागे सिगल उड्या मारत होता. जसा की तो ही मिटिंगमध्ये भाग घेण्यासाठी जात होता.





“तुझा एक मित्र आहे, ओब्दिहा,” वडील म्हणाले. जेव्हा मिटिंग हाउसच्या गेटवर त्यांनी मागे वळून पाहिले.

“ओब्दिहाचा एक मित्र आहे,” मोसेस म्हणाला.

“तुझ्या मित्राला सांग की मिटिंगसाठी आत ये,” एज़ा म्हणाली.

रैचेलने त्याल चिडवलं नाही. त्याने ओब्दिहाचा हात पकडला. पण त्याला कोणाचा हात धरायचा नव्हता. त्याने एक दगड उचलला आणि पक्ष्याला मारला. नेम लागला नाही. सिगल उडून दूर गेला आणि गायब झाला.पण जेव्हा मिटिंग संपली आणि सगळे बाहेर आले तेव्हा पक्षी तिथंच दिसला.तो त्याची वाट पहात होता.





काही दिवसानंतर ओब्दिहाला घराच्या बाहेर जावू वाटत नव्हतं.

नाष्ट्याच्या वेळी वडिलांनी विचारले, “ओब्दिहा तुझा मित्र कसा आहे?”

“कोणता मित्र? ओब्दिहाने विचारले. त्याच्या तोंडात ब्रेड आणि जॅमचा घास होता.

“तुझा आपला सिगल!” एज़ा म्हणाली.

रिबेका हसू लागली.

“तो पक्षी माझा मित्र नाही.” ओब्दिहा ओरडून म्हणाला.

आईने बोट पुढे करत म्हटलं, “वाईट वाटून घेवू नकोस, ओब्दिहा,” ती म्हणाली. “माझ्या मनात एक चांगली गोष्ट आली की देवाच्या एका प्राण्याला तू आवडतोस.”

“पण मला तो आवडत नाही,” ओब्दिहा म्हणाला. “सिगल दुसऱ्या लोकांच्या मागे तर इकडेतिकडे जात नाही.”



नाष्टाझाल्यानंतर लगेचच बर्फ पडू लागला. दुपारी आईने ओब्दिहाच्या गळ्यात लोकरीचा स्कार्फ घातला. त्याला थोडे पैसे आणि एक पिशवी दिली आणि पीठ आणण्यासाठी जेकबच्या गिरणीत पाठवले.

पक्षी कुठे दिसत नव्हता. “कदाचित त्याला बर्फ आवडत नसेल.” जेकबच्या गिरणीत जात असतांना तो म्हणाला. “कदाचित तो उडून मेनलैंडला गेला असेल. पक्षी त्याच्यामागे येत नाही हे बघून तो खुश झाला,इतका खुश झाला की जेकबच्या गिरणीपर्यंत जातांना त्याने बुटांनी बदकासारख्या पायाच्या खुणा केल्या हे त्याच्या लक्षात आलंच नाही..

गिरणीवाल्याने त्याच्या पिशवीत पीठ भरून दिले आणि ओब्दिहाने त्याला पैसे दिले जे त्याला आईने दिले होते, ने ते त्याने खिश्यातून काढून दिले.

“हे ठेव, मुला,” एक पेनी देत जेकब स्लेड म्हणाला, “आणि ते खिशातून पडू देवू नको.”





घरी येतांना ओब्दिहाने एका जागी बर्फावर घसरण्याचा प्रयत्न केला, पण तो घसरला आणि तो उलटा पडला. त्याची टोपी उडाली आणि त्याच्या कानात आणि बुटात बर्फ गेला. त्याचा कोट ओला झाला, पिठाची पिशवी पण ओली झाली. त्याच्या गुडघे दुखायला लागले. त्याचे पैसे बर्फात पडले. तो डोंगरावर एकटाच होता. कापत-कण्हत तो उभा राहिला. लंगडत लंगडत तो घराकडे निघाला.

ऑरेंज स्ट्रीटवर जवळजवळ प्रत्येक घराच्या छतावर सिगल बसलेले होते. पण त्याला तो सिगल दिसला नाही, जो त्याच्या मागे येत होता. सगळ्या पक्ष्यांची तोंडं दुसरीकडे होते आणि कोणीच त्याच्याकडे बघत नव्हते.





ओलं पीठ बघून आई नाराज झाली. आईने अंघोळीसाठी त्याला गरम पाणी दिलं आणि घालण्यासाठी कोरडे कपडे दिले. आणि खाण्यानंतर एक गरम गरम पेय दिले. ज्याची चव खूप खराब होती. मग आईने विचारलं, “तुझा गुडघा अजून दुखतो का?”

“थोडं बरं वाटत आहे,” ओब्दिहा विचार करत होता की जर पैसे हरवल्याचं दुःख थोडं कमी झालं असतं तर बरं झालं असतं.

“मग झोप.”

ओब्दिहाने प्रार्थना केली आणि जशी आई खोलीच्या बाहेर गेली, जसा तो अंथरुणावरून हळूच उठला आणि खिडकीजवळ आला. सिगल खिडकीच्या बाहेर दिसत नव्हता. तो अंथरुणावर झोपला आणि विचार करू लागला की तो पक्षी कुठे गेला.

पुढच्या दिवशी आणी त्याच्याही पुढच्या दिवशी आणि त्यानंतर कितीतरी दिवस त्याला घराच्या बाहेर त्या पक्ष्याने त्याचा पाठलाग केला नाही. रोज रात्री ओब्दिहा खिडकीच्या बाहेर बघत असे पण सिगल परत आला नाही.





मग एक दिवस तो पक्षी त्याला गोदीजवळ दिसला. तिथं समुद्री किनाऱ्यावर मासे पकडणाऱ्या एका नावेजवळ अनेक सिगल पक्षी होते. तो त्या पक्ष्यांबरोबर होता. पण काहीतरी गडबड होती. एक जुना-गंजलेला मासे पकडण्याचा आकडा त्याच्या चोचीत होता.

“जेव्हा तू मासे पकडण्याच्या जाळ्यातून मासे चोरतात तेव्हा असेच होते. तुला असेच पाहिजे.” ओब्दिहा म्हणाला आणि तिथून निघाला.

तो काबलस्टोन रस्त्यावरच्या एका लोहाराच्या दुकानाजवळ गेला तेव्हा त्याने पाहिले की सिगल त्याच्या मागे-मागे येत होता.

ओब्दिहा थांबला.पक्षीपण थांबला.त्याच्या चोचेत अडकलेला माशाचा आकडा हवेत हलत होता.

“जर तू शांत राहिला तर मी तुझ्या चोचेतून अडकलेला आकडा काढण्याचा प्रयत्न करेन.”

सिगल स्थिर उभा राहिला.

“मी तुला दुखापत करणार नाही” ओब्दिहा म्हणाला.



पक्ष्याला त्याने त्याच्या जवळ अगदी जवळ येवू दिलं.एका क्षणात माशाचा आकडा ओब्दिहाच्या हातात होता. .......



......आणि सिगल हळू-हळू आवाज काढत, आकाशात गोल-गोल उडत होता.तो लाईटहाउस कडे उडत गेला. ओब्दिहा त्याच्याकडे दिसेनासा होईपर्यंत बघत राहिला. मग गंजलेला आकडा त्याने फेकून दिला आणि घरी निघून आला.

जसा त्याने घरात प्रवेश केला तेव्हा तंदूर मध्ये भाजणाऱ्या पावाचा सुगंध आला. स्वयंपाक घरात आई आणि रैचेल तंदूर मधून पाव काढत होते.आईने ताजा, गरम पावाचा तुकडा कापून त्याला दिला आणि त्याच्यावर लोणी लावले. एका स्टुलावर बसून तो पाव खाऊ लागला आणि खाता खाता त्याने सांगितले की पक्ष्याचे काय झाले ते.

“चांगलं आहे,” रैचेल म्हणाला. “तो बुद्धू पक्षी तुला दिसणार नाही आता.”

“हो,” ओब्दिहा म्हणाला, “मलाही वाटतं आता तो दिसणार नाही.”





रात्री झोपेचा वेळी आईने त्याला अंथरूणावर झोपवलं आणि ती खिडकीजवळ गेली, “ओब्दिहा “ती म्हणाली, “हे बघ”

तो अंथरूणावरून उडी मारून बाहेर आला. “हा तुझा सिगल आहे का?”

स्वच्छ निळ्या आकाशात वाऱ्याच्या दिशेने तोंड करून एक सिगल चिमणीवर बसला होता.

“हा तोच आहे,” ओब्दिहा म्हणाला. “आई तो कापतो आहे.”

“त्याचे पंख त्याला गरम ठेवतात. पण तुला पंख नाहीत, ओब्दिहा. तुला थंडी वाजण्याच्या आधी तू आपल्या अंथरुणावर जा.”

ओब्दिहा मग पटकन पांघरुणात शिरला.आणि आईने त्याची पापी घेत त्याला शुभ रात्र म्हटले.

जोरदार, थंड वारं वाहत होतं. ओब्दिहा दुलईत आरामात झोपला.

“आई...”

“हो,ओब्दिहा.”

“तो सिगल माझा मित्र आहे.”

“मी खुश आहे, ओब्दिहा, शुभ रात्र.”

“आणि आई...”

दरवाज्याजवळ गेलेली आई वळली. तिच्या हातात पकडलेली मेणबत्ती विझू लागली आणि शेवटी विझली. “बोल, ओब्दिहा,” ती म्हणाली.

“मी त्याला मदत केली म्हणून मी त्याचा मित्र आहे.”

